UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# Index



| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | *Synthesis of Some Substituted Phenyl Methylene Bis Indole Using nickel Aluminum Oxide* | *Shashikant A. Kadam, Ravindra S. Shinde* | 1 |
| 2 | *The Suggestive Discription Of Motivation-An Important Management Function In The Organization Scenario* | *Dr. Prashant M. Puranik* | 4 |
| 3 | *Format of Mock Trial in Vijay Tendulkar's Play "Silence! The Court is in Session"* | *Mr.Bobade Tukaram Balasaheb* | 8 |
| 4 | *Use of ICT for the Research in health and education field* | *Rekha B. Lonikar* | 13 |
| 5 | *Use of Information and Communication Technology (ICT) in the Library* | *Dr. Mortale Heera Nivrattirao* | 15 |
| 6 | *"Effect of Demonetization Policy on 'Weaker Sections ofIndian Society."* | *Dr. Shyamsundar Pandharinath Waghmare* | 18 |
| 7 | *Medical Library Cosortium* | *Devidas Vankati Phad* | 22 |
| 8 | *Process of rehabilitation with reference to Warana irrigation project of Maharashtra* | *Mr. M. B. Chavan* | 27 |
| 9 | *Effect Of Selected Exercises On Arm And Back Strength Of Archers* | *Dr. Sunil kumar* | 33 |
| 10 | *Role of Foreign Direct Investment (FDI) In Banking Sector* | *Syed Vazaeer Syed Isa* | 42 |
| 11 | *Status of Organic Farming and Insurance Research Experiences in Rice* | *Dr. Rakesh Patidar ,* <br> *Dr. Dheeraj Negi Director Pragyan* | 45 |
| 12 | नारी तुम क्या हो ......? | विद्या किशनराव सावते | 48 |
| 13 | मराठवाडा के प्रमुख संत | सहा. प्रा. डॉ. बालाजी महाळंकर | 53 |
| 14 | "स्त्रीभ्रूणहत्येचा तात्त्विक अन्वयार्थ " | प्रा. बाजीराव पाटील | 57 |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | भारतीय राज भाषाएँ एवं संविधान | प्रा. नयन भादुले–राजमाने | 61 |
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 20 | स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 89 |
| 22 | 'ग्रामीण साहित्य' हा वेगळा प्रवाह कशासाठी ? | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 92 |
| 23 | सामाजिक संशोधन पध्दतीचा चिकित्सक अभ्यास | मुरगे एम.यु | 95 |
| 24 | "जलयुक्त शिवार अभियान : एक वरदान" | प्रा. डॉ. हरी साधु वाघमारे | 98 |
| 25 | राष्ट्रीय एकात्मतेसाठी तथागत बुध्दांचे विचार : एक अभ्यास | प्रा. डॉ. बालाजी गव्हाळे | 102 |


1.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II , Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता

**डॉ.सतीश बाबुराव डोंगे**

*अर्थशास्त्र विभाग*

*कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी*

-----------------(16)-----------------

**प्रस्तावनाः**

उद्योजकता आर्थिक विकासाच्या दृष्टीने औद्योगिक विकासाला चालना देणारे मुख्य स्त्रोत असून त्यामुळे जास्तीत कामाची संधी प्राप्त होण्याचा हा प्रशस्त मार्ग आहे. ज्यामुळे देशाचा विकास होऊ शकतो. प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास हा राष्ट्रातील उद्योजकतेवर अवलंबून असतो. उद्योजकता हा पुरुषांचा प्रांत आहे अशी धारणा आता बदलत्या काळात बदलत बदलत चालली आहे. अलीकडे विकसित व विकसनशील अशा दोन्ही समाजांमध्ये महिला स्वतः पुढाकार घेऊन उद्योजकांची भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द झालेल्या आहेत. महिलांची उद्योजकता हे आजचे सत्य आहे. जसे की, महिला, व्यापार, उत्पादकता आणि प्रक्रिया व सेवा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सक्रिय सहभाग घेत आहेत.

हे सत्य कोणी नाकारु शकत नाही की हजारो महिलांनी गुजरात राज्याच्या आर्थिक स्थितीला आपल्या दुध गंगेमुळे चांगला आकार प्राप्त झाला आहे.

महिला उद्योजकांची अंगी असणारी प्रचंड मेहनत, त्यागाची भावना आणि सहनशिलता यामुळे त्या उत्कृष्ट उद्योजक होऊ शकतात ही बाब नाकारता येत नाही. सदर शोधनिबंधात महिला उद्योजकांचे विकासातील योगदान अभ्यासले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. महिला उद्योजक ही संकल्पना अभ्यासणे.

२. महिला उद्योजकांचे विकासातील योगदान अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती :**

महिला उद्योजकांचे विकासातील योगदान अभ्यासण्यासाठी द्वितीय साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आला असून यामध्ये महिला उद्योजकांशी संबंधीत विविध ग्रंथ, पुस्तके, मासिके व त्यातील लेख इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

**महिला उद्योजक : अर्थ आणि प्रकार**

महिलांची उद्योजकता म्हणजे महिलांनी स्थापन केलेले किंवा महिलांकडून ज्यांचा कारभार संचालित होतो असा उद्योग होय. महिलांची उद्योजकता ही आपल्या देशात आश्यर्यकारक गोष्ट नाही. कारण वैदीक काळपासून महिला तयार कपडे बनविणे, भरतकाम, सौदर्य प्रसाधने, सुवासिक तेल बनविणे, मातीची भांडी तयार करणे यात महिला तरबेज आहेत. महिलांची उद्योजकता व पुरुषांची उद्योजकता यामध्ये अंतर नसले तरी महिला उद्योजकांच्या उद्योजकतेची वैशिष्ट्ये वेगळी आहेत. महिला उद्योजकांना उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या प्रेरणा वेगवेगळ्या आहेत. महिला उद्योजकांचे प्रश्न इतरांपेक्षा वेगळे आहेत आणि महिला उद्योजकांना सरकारी यंत्रणेकडून काही वेगळ्या मदतीची पण अपेक्षा आहे. या सर्व बाबी विचारात घेता महिला उद्योजक आणि महिला उद्योजकता यांचा विकास साधन काळाची गरज आहे.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| | | | |
|---|---|---|---|
| **Half Yearly** | Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648** |
| **Issue X Vol II ,** | **Jan. 2018** | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143** |


महिला उद्योजकतेची व्याख्या अभ्यासता असे म्हणता येईल की,

A Small scale industrial unit/industry related service or business enterprise managed by one or more women entrepreneurs in proprietary concerns or in which she/they individually or jointly have a share capital of not less than 51 percent as partners/ share holders/directors of private limited company/members of co-operative society, is defined as a women enterprise.

उपरोक्त व्याख्येतून खालील बाबींचा स्पष्टपणे उल्लेख होतो.

- ☞ महिलांचे उपक्रम हे लघुउद्योग, उद्योगांशी संबंधित सेवा किंवा व्यावसायिक उपक्रम ह्या स्वरुपात असतात.
- ☞ महिलांच्या उद्योगांचे संघटन व्यक्तीगत मालकीचे उपक्रम, भागीदार, सहकारी संस्था किंवा खाजगी मर्यादित संस्था ह्यापैकी कोणत्याही पद्धतीने करण्यात येते.
- ☞ महिलांच्या उद्योगाचा कारभार प्रत्यक्षात एक किंवा जास्त महिलांकडूनच सांभाळण्यात येत असावा.
- ☞ उद्योगाच्या भांडवलामध्ये महिलांचे भांडवल व्यक्तिशः किंवा संयुक्तपणे किमान ५१ टक्के असणे आवश्यक आहे.

उद्योगांच्या संचालनात व कारभारात महिला उद्योजकांची भूमिका प्रत्यक्ष व थेट असावी. ह्या उपक्रमांचे नेतृत्त्व महिला उद्योजकांकडेच असावे . थोडक्यात, महिला उद्योजकांच्या उद्योगांमध्ये महिला उद्योजकांची भूमिका ही कळसूत्री बाहुल्यासारखी कधीच नसावी तर हा खेळ दाखविणाऱ्या कलाकारांसारखी असावी.

ए.दाविड सिल्हर यांनी आपल्या Enterprising women : Lessons from 100 of the greatest entrepreneurs of our day या पुस्तकात असे लिहिले आहे की, या महिला उद्योजकांनी तीन बिलीयन डॉलर एवढी संपत्ती निर्माण केली असून पाच लक्ष रोजगार निर्माण केले आहेत. आज अमेरिकेत एकूण उद्योजकांपैकी अर्ध्या महिला उद्योजक आहेत त्यांनी बाजारपेठेवर ताबा मिळविला आहे. कारण महिलांमध्ये संयम, चिकाटी व सहनशक्ती हे गुण जन्मतःच असतात.

थोडक्यात, ज्या महिला उद्योगधंद्याचा विचार करतात, सुरुवात करतात, सुव्यवस्थित ऋण देतात. उत्पादनाच्या बाबी एकत्र करतात, उद्योग चालवतात, धोके हाताळतात त्या महिला उद्योजक होय. महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्थापन केलेले किंवा महिलांकडून ज्यांचा कारभार संचालित होतो असे उद्योग होय.

**महिला उद्योजकांचे प्रकार**

महिला उद्योजकांचे ठळक प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

- अभिप्रेरक आणि प्रशिक्षीत महिला उद्योजक
- अप्रशिक्षित महिला उद्योजक
- सक्तीने व स्वेच्छेने झालेल्या महिला उद्योजक
- ग्रामीण व शहरी उद्योजिका

**महिला उद्योजकांची वाटचाल :**

एखाद्या देशात महिला उद्योजक महत्त्वाची भूमिका पार पाडतात. विशेष करुन त्यांचे आर्थिक विकासात विकासामध्ये मोठे योगदान आहे. अलिकडच्या वर्षात प्रगत देशातही म्हणजे अमेरिका आणि कॅनडा देशातही महिलांची भूमिका छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यात वाढत असलेली दिसून येते. याबाबत आय.आय.टी. दिल्ली यांनी अभ्यासलेल्या अहवालात खालील तथ्ये जाहिर केली आहेत.

- अमेरिका आणि कॅनडामध्ये १/३ छोटे उद्योग महिलांच्या ताब्यात आहेत.
- ब्रिटनमध्ये १९८० पासून महिलांची कार्यशक्ती पुरुषांपेक्षा तिप्पट दिसून येते.
- आशियातील देशामध्ये एकूण कार्यशक्तीच्या ४० टक्के महिलांची कार्यशक्ती आहे.
- चीनमध्ये पुरुषांपेक्षा महिला कमीत कमी दुप्पट नवीन उद्योग तेथे चालू करण्याच्या स्थितीत आहेत.
- जपानमध्ये महिला उद्योजकांची टक्केवारी वाढली आहे.
- १९८७-८८ च्या सर्वेक्षणानुसार भारतात ५.५ टक्के उद्योजकांचे व्यवस्थापन आणि मालकी महिलांची होती. तर २००४-०५ च्या सर्व्हेनुसार भारतात ८.०० टक्के उद्योगांची मालकी व व्यवस्थापन महिलांद्वारे केले जात आहे.

इतर विकसित देशाच्या तुलनेत भारतीय महिलांचे उद्योजकतेतील प्रमाण अत्यल्प असणे यामागे अनेक कारणे आहेत. उदा. भारतातील वर्णव्यवस्था, पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्था, भारताची रचना ही ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्था असल्याने ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. याच कारणामुळे शहरी भागात महिला उद्योजकांचे प्रमाण थोड्याफार प्रमाणात असू शकते. परंतु ग्रामीण भागात महिला उद्योजकांची संकल्पना अतिशय कठीण आहेव हे जरी खरे असले तरी देशाचा सर्वांगीण विकास जर साधावयाचा असेल तर महिला उद्योजकांची समर्थपणे उद्योजक म्हणून कार्य करणे अनिवार्य आहे. भारताच्या एकूण आहे त्या परिस्थितीत देशातील महिला उद्योजक म्हणून पुढे येत आहेत.

महिलांनी उद्योजकतेत प्रवेश करणे हा भारतात चमत्कार आहे. महिलांची उद्योजकता त्यांच्या स्वयंपाक घरातील उद्योग पापड, पावडद, लोणचे (पीकल्स) या तीन **'प'** पासून झाली आहे. शिक्षणाच्या वाढत्या वेगामुळे महिला तीन **'प'** पासून आधुनिक तीन **'इ'** मध्ये प्रगती साधत आहेत. इंजिनियरिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि एनर्जी, याचा अर्थ असा आहे की, महिला उद्योजकांना प्रोत्साहन आणि संधी दिल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात कामगीरी बजावू शकतात.

**महिला उद्योजकांच्या समस्या**

भारतसारख्या विकसनशील देशात ज्या देशात ज्या देशात पुरुषप्रधान व्यवस्था आहे त्या देशातल्या स्त्रीने उद्योगधंदा सुरु करणे म्हणजे पाप समजले जाते किंवा हिण कार्य समजले जाते. भारतातील वर्ण व्यवस्थेत जसे शुद्रांना अतिशय अपमानकारक वागणूक दिली जात होती त्या शूद्रांपेक्षा वाईट वागणूक भारत देशात महिलांना दिली जात होती. आणि आजची २१ व्या शतकातील स्त्री उद्योजक बनत असतांना तिच्या समोरील असणाऱ्या सर्व प्रकारच्या समस्या पुरुष उद्योजकापेक्षा निश्चतच वेगळ्या असतात. त्या म्हणजे-

- आर्थिक अडचणी, स्थिर भांडवल व खेळत्या भांडवलाचा अभाव
- कच्च्या मालाच्या निर्मितीचा अभाव, यंत्रसामुग्रीचा उपयोग, विजेचा प्रवाह, दळणवळणाची साधने, वस्तूची मागणी, बाजारामधील परिस्थिती, स्पर्धा, कामगारांचे संप, कर्मचाऱ्यांची बेशिस्त, कर आकारणी, सरकारने लावलेले निर्बंध, पर्यवेक्षण करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची मनमानी व हस्तक्षेप, राज्यकर्त्यांचा अवाजवी हस्तक्षेप इ. सर्वसाधारण समस्यांना तोंड द्यावे लागते.
- महिलांची गतिक्षमता निरनिराळ्या कारणांमुळे पुरुषांइतकी नसते. त्यामुळे त्याचे परिणाम त्यांच्या उद्योजकीय प्रवृत्तीवर दिसून येतात.
- महिलांवर मुले व इतर कौटुंबिक सभासद यांची देखरेख करण्याची जबाबदारी असते.
- वेळेच्या अभावी उद्योगक्षेत्रात प्रवेश करण्यासाठी पतिचा आधार व मंजुरी घेणे आवश्यक असते.

- भारतात एकूण महिलांपैकी ६०% महिला आज देखील अशिक्षित आहेत. अशिक्षितपणा हे सामाजिक व आर्थिक अडचर्णींचे मूळ कारण आहे.
- शिक्षणाच्या अभावामुळे महिलांना उद्योग, तंत्रज्ञान व विक्री ज्ञानाचा अभाव दिसून येतो, त्यामुळे उद्योग चालविण्यात अडचणी निर्माण होतात.
- मर्यादित क्षमता असणाऱ्या महिलांना आजच्या स्पर्धात्मक वातावरणात अनेक समस्या निर्माण होतात. जीवघेण्या स्पर्धांना तोंड द्यावे लागते.
- आत्मविश्वासाचा अभाव महिलांमध्ये असल्याने महिला धोके स्विकारण्यात पटकन तयार होते नाही. धोके स्विकारण्याची महिलांची क्षमता सुध्दा कमी असते. दुय्यम भूमिका महिलेला करावी लागते त्यामुळे बऱ्याचदा महिला आपली उद्योजकीय उत्कंठा दडपून टाकते.

**महिला उद्यमशीतेचा विकास**

महिला उद्योजकांना येणाऱ्या अनेक अडचणी आपण अभ्यासल्या, या अडचणींवर मात करुन महिलांची उद्योजकता आज विकसित होत आहे. पूर्वीच्या काळी महिला उद्योजिका ही गर्भ श्रीमंत एखाद्या कारखानदाराची पत्नी, भगिनी किंवा मुलगी वंशपरंपरेने कारखानदारीची गादी चालविणारी असणार असे गृहित धरले जात असे. आज मात्र हा काळ पालटला आहे. कारण सर्व जागृत महिलांची वाटचाल उद्योग व्यवसायाच्या एका नव्या वाटेने चालू आहे हा रस्ता आज रुळलेला नाही पण उद्या या पाऊलवाटेचा निश्चितच हमरस्ता होणार आहे. महिलांच्या उद्यमशीलतेचा बहर आलेला दिसतोय. कारण महिलांच्या नेतृत्वाखाली उद्योग मुळापासून उभा राहणे व स्थिरावणे, वाढणे नि फोफावणे हेही हल्ली मोठ्या प्रमाणात घडत आहे. लक्षणीय बाब अशी की, उच्चशिक्षित महिलांच्या बरोबरीने अशिक्षित, अल्पशिक्षित ग्रामीण महिलाही आपापल्या परीने छोटा मध्यम उद्योग चालवित आहेत. खेडेगावातील लघुउद्योजिकाही आता शहरातल्या कार्यक्रमात स्वतःचा स्टॉल लावत आहे. महत्वाचा सामाजिक बदल म्हणजे भारतीय पुरुषही आता महिलांना उद्योजक म्हणून खुल्या दिलाने स्वीकारत आहेत.

नव्या भारताची उभारणी वेगाने व सर्वांना सामावून घेणारी व्हायची असेल तर महिलांना अधिकाधिक प्रमाणात उद्योगात येण्यास प्रवृत्त करण्याला पर्याय नाही. कारण उद्योजकीय प्रक्रिया स्वच्छ करण्याच्या प्रयत्नांना महिला अधिक वेगाने पुढे नेऊ शकतात. महिलांच्या उद्योजकीय सहभागामुळे कुटुंबातील मुला-मुलींना सर्वार्थाने स्वतःचा विकास करण्याची संधी मिळू शकते. महिलांची उद्यमशीलता बहरण्यासाठी आज उत्तम वातावरण तयार झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या सहज उपलब्धतेमुळे महिला आज प्रत्येक बाजारपेठेचा अभ्यास घरबसल्या करु शकतात. या सुवणसंधीचा फायदा सगळयांनी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. पाटील आनंद, महिला सबलीकरण, स्पर्धा परिक्षा. (२०१३)
२. गोसावी मंजुषा, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.(२००८)
३. पाटील शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४. केळकर मीना, भारतातील स्त्री संकल्पना आणि प्रतिमा, निमित्त प्रकाशन, पुणे.
५. अनंतराम शरयु, भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६. विद्युत भागवत, स्त्री प्रश्नांची वाटचाल परिवर्तनाची दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे.